# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com


## शिक्षण शुल्क समितीच्या दि.०८-०९-२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

शिक्षण शुल्क समितीची बैठक **दि.०८-०९-२०२३ रोजी दु.०१:३० वाजता** मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, ४१२-बी, भांबुर्डा, बहिरत पाटील चौक, लक्ष्मी सोसायटी, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६ या ठिकाणी पार पडली. शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | **अध्यक्ष** |
| २ | डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | **सदस्य** |
| ३ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे | **सदस्य** |
| ४ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | **सदस्य सचिव** |
| ५ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | **सदस्य** |

श्री.अशोक मांडे, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व श्री. प्रकाश बच्छाव,सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे बैठकीस उपस्थित होते. विशेष निमंत्रित म्हणून श्री.मनोज चांडक-सनदी लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, श्री. सुनिल सोनवणे, शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ तथा प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई, डॉ.राजेंद्र ढाकणे, शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ तथा सह.प्राध्यापक, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई हे बैठकीस उपस्थित होते.

मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय-सदस्य यांचे प्रतिनिधी यांनी बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत दूरध्वनीवरून कळविले आहे. डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) -सदस्य तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन,

MPK LL-P. Co. ९-६२३३६१

पुणे, श्री. व्ही. बी. शर्मा-सदस्य, सनदी लेखापाल, सौ.स्वरूपा संग्राम थोपटे, संस्था प्रतिनिधी, राजगड ज्ञानपीठ, भोर, पुणे-निमंत्रित सदस्य हे बैठकीस उपस्थित नव्हते.

सदर बैठकीच्या सुरूवातीस सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी शिक्षण शुल्क समितीच्या दि.२०.०७.२०२३ च्या बैठकीच्या इतिवृत्तानूसार केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा सादर केला. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.,

**विषय क्र.०१:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शेवटच्या संधीमध्ये शै. वर्ष २०२१-२२ करिता विलंब शुल्कासह प्राप्त झालेल्या १५ महाविद्यालयांपैकी तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या १४ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

**१.१** शिक्षण शुल्क समितीच्या दि.११.०४.२०२३ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सन २०२१-२२ ला ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नव्हते, अशा महाविद्यालयांना शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर करण्यासाठी शेवटची संधी देण्यात आली होती. तेव्हा एकुण १५ महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले होते. सदर प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीच्या दि.२०.०७.२०२३ च्या बैठकीत ठेवण्यात आले. सदर बैठकीतील ठरल्याप्रमाणे महाविद्यालयांकडून रोखीने केलेल्या वेतनासंदर्भात खुलासा मागविण्यात आला. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees(Teaching &Non-teaching)is to be paid through Bank Accounts only. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक होते, तथापि, महाविद्यालयांनी याचे पालन केलेले नाही. त्याअनुषंगाने प्रस्तावांची समितीच्या खर्च लेखापाल यांच्याकडून पूनर्तपासणी करून बँकेमार्फत अदा केलेल्या वेतन खर्चानूसार परिगणना करून आलेले शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**१.२** समितीकडे प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयापैकी केशवराज अध्यापक महाविद्यालय, सोनेगाव, जि. बीड या महाविद्यालयाने समिती कार्यालयाकडून वारंवार कळवून सुध्दा परिपूर्ण लेखापरिक्षण अहवाल, बँक स्टेटमेंट व इतर अभिलेख सादर केलेले नसल्यामुळे समितीला सदर महाविद्यालयाच्या प्रस्तावाची तपासणी करता आली नाही. त्यामुळे शुल्क निश्चिती करण्यात आलेली नाही. सबब सदर महाविद्यालयाचे नाव प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना उचित कार्यवाहीस्तव कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

**१.३** तसेच उपरोक्त महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांनी स्वतंत्र विकास खाते व विकास योजना सादर केलेल्या आहेत. अशा महाविद्यालयांना विकास शुल्क मंजूर करण्यास मान्यता

देण्यात आली. पुढील वेळेस प्रस्ताव सादर करताना विकास शुल्क मंजूर झालेल्या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्षात विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा विकास शुल्काचा स्वतंत्र ताळमेळ (हिशोब) सादर करणे बंधनकारक राहील, असा निर्णय झाला. उर्वरित महाविद्यालयांनी परस्पर विकास शुल्क आकारू नये,असा निर्णय झाला.

| | |
|---|---|
| **परिशिष्ट अ -बी.एड-** | ०९ |
| **परिशिष्ट ब-एम.एड-** | ०१ |
| **परिशिष्ट क-बी.पी.एड-** | ०२ |
| **परिशिष्ट ड-बी.एस्सी.बी.एड-** | ०१ |
| **परिशिष्ट इ -बी.एड- एम.एड-** | ०१ |

**१.४** ज्या महाविद्यालयांनी वेतन रोख स्वरूपात अदा केलेले आहे अशा महाविद्यालयांच्या वेतन खर्चाची पडताळणी समितीस करता आलेली नाही. सदर महाविद्यालयांचे बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनानूसार परिगणना करून खूप कमी शुल्क येत आहे, अशा महाविद्यालयांना रोख स्वरूपात अदा केलेल्या वेतनानूसार परिगणना करून आलेले शुल्क किंवा शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार असलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**१.४.१** मुंबई बी.एड कॉलेज फॉर वूमन, वडाळा, मुंबई या महाविद्यालयाने सन २०२०-२१ मध्ये एकूण १५७ विद्यार्थ्यांकडून तत्कालीन शुल्काच्या तुलनेत ३१.३५ लक्ष एवढी शुल्क जास्तीचे वसूल केल्याचे लेखापरिक्षण अहवालात दिसून आले. सदर महाविद्यालयाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. तसेच सरस्वती कॉलेज ऑफ एज्युकेशन,किनवट, जि. नांदेड या महाविद्यालयाने सन २०२०-२१ मध्ये एकूण ११० विद्यार्थ्यांकडून तत्कालीन शुल्काच्या तुलनेत १६.५२ लक्ष एवढी शुल्क जास्तीचे वसूल केल्याचे लेखापरिक्षण अहवालात दिसून आले. याबाबत महाविद्यालयाने खुलासा केलेला नाही. त्यामुळे उपरोक्त दोन महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून जास्तीचे वसुल केलेल्या शुल्काची रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यात यावी, त्याबाबत समितीस पुरावे सादर करावेत, अन्यथा नियमावलीतील नियम क्र.२.१० नूसार महाविद्यालयाचे नाव प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई तसेच एन.सी.टी.ई. नवी दिल्ली यांना उचित कार्यवाहीस्तव कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील.

**विषय क्र.०२ सन २०२१-२२ ला शुल्क निश्चिती झालेल्या तथापि खर्चात वाढ झाल्यामुळे सन २०२२-२३ ला प्रस्ताव सादर (बी.एड-०१) तसेच सन २०२२-२३ ला नव्याने प्रस्ताव सादर**

**केलेल्या (बी.पी.एड-०१) तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या एकूण ०२ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

सन २०२१-२२ ला शुल्क निश्चिती झालेल्या तथापि खर्चात वाढ झाल्यामुळे सन २०२२-२३ ला प्रस्ताव फेरसादर केलेल्या बी.एड महाविद्यालयाच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने परिगणना करून आलेले शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच सन २०२२-२३ ला नव्याने प्रस्ताव सादर केलेल्या बी.पी.एड महाविद्यालयाने संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केलेले असल्यामुळे समितीला वेतन खर्चाची पडताळणी करता आलेली नाही. त्यामुळे शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ१-बी.एड-** ०१

**परिशिष्ट क१-बी.पी.एड** ०१

**विषय क्र.०३ महाविद्यालयांचे एन.सी.टी.ई. च्या सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमता आदेशानूसार शुल्क फेरनिश्चिती बाबत.**

-दोन महाविद्यालयांकडून एन.सी.टी.ई.चे सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे आदेश सादर केल्यामुळे महाविद्यालयाच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमता गृहित धरून परिगणना करून आलेले शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**(परिशिष्ट-अ२)- बी.एड.** ०२

**विषय क्र.०४ अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्क मंजूरीबाबत.**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (cet cell) यांच्या सन २०२२-२३ च्या नोंदणीकृत यादीनूसार एकूण १२४ विनाअनुदानित व कायम विना अनुदानित अल्पसंख्यांक शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र नोंदणीकृत महाविद्यालयांपैकी ९२ महाविद्यालयांनी समितीच्या यापूर्वीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानूसार शुल्क पडताळणीबाबत कार्यवाही केलेली आहे. उर्वरित ३२ महाविद्यालयांपैकी १२ महाविद्यालयांकडून तसेच विनाअल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या यादीतील १ अल्पसंख्यांक महाविद्यालयाने शुल्क पडताळणीसाठी असे एकूण १३ महाविद्यालयांकडून अभिलेख प्राप्त झालेले आहेत.

शिक्षण शुल्क समितीच्या दि.२०.०७.२०२३ च्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त १३ महाविद्यालयांकडून वेतनासंदर्भात खुलासा मागविण्यात आला. त्याअनुषंगाने प्रस्तावांची पूनर्तपासणी करून बँकेमार्फत अदा केलेल्या वेतन खर्चानूसार परिगणना करून आलेले शुल्क पडताळणी करण्यात आले. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees(Teaching &Non-teaching)is to be paid through Bank Accounts only. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत:

बँकेमार्फत करणे आवश्यक होते, तथापि, महाविद्यालयांनी याचे पालन केलेले नाही. काही महाविद्यालयांनी संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केल्यामुळे शिष्यवृत्तीसाठी शुल्काची पडताळणी करता आलेली नाही. खर्च लेखापालांकडून सदर महाविद्यालयांच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतन खर्चानूसार परिगणना करून आलेल्या शुल्काच्या मर्यादेत महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या शुल्कास मंजूरी देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ३ बी.एड - १३ महाविद्यालये**

उपरोक्त परिशिष्टात नमुद ज्या महाविद्यालयांनी बँकेमार्फत वेतन अदा न केल्यामुळे महाविद्यालयांच्या शुल्कात घट झाली आहे अशा महाविद्यालयांनी यापुढे वेतन बँकेमार्फत अदा केले असल्यास ही महाविद्यालये पुढील वर्षी शुल्क पडताळणी करिता अभिलेख सादर करू शकतील.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील.

**विषय क्र.५ शिक्षण शुल्क समितीचे सदस्य,विशेष निमंत्रित तसेच महाविद्यालयांनी सूचविलेल्या सुधारणा/अभिप्राय नूसार शिक्षण शुल्क समितीची सुधारित नियमावली व नमुना अर्ज अंतिम करणेबाबत.**

दि.२०.०७.२०२३ च्या बैठकीच्या इतिवृत्तानूसार नियमावलीची soft copy राज्यातील सर्व महाविद्यायांना पाठवून त्यावर सूचना/सुधारणा/बदल मागविण्यात आले. त्यावर फक्त तीन महाविद्यालयांकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. महाविद्यालये, उपसमिती, समिती तसेच विशेष निमंत्रित यांच्या सूचनांनूसार समितीच्या सुधारित नियमावलीस समितीची तत्वत: मान्यता देण्याचा निर्णय झाला.

ज्याप्रमाणे शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडून usage Charges निश्चित करून दिले जातात.त्याप्रमाणे शिक्षण शुल्क समितीस usage charges महाविद्यालयांना निश्चित करून देता येतील काय ? usage charges देणेबाबतशुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा येथे कोणते निकष वापरतात, याबाबत तसेच समितीची नियमावली अंतिम करण्याकरिता डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई तथा सदस्य, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली श्री.मनोज चांडक -सनदी लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे, श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, श्री. सुनिल सोनवणे, शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ, तथा प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई, डॉ.राजेंद्र ढाकणे, शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ तथा सह.प्राध्यापक, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई यांचा समावेश असलेली उपसमिती स्थापन करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.६ -महाविद्यालयांच्या विकास शुल्कास मान्यता देणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीची दि.०५.०१.२०२२ व दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील निर्णयानूसार महाविद्यालयांकडून विकास खाते व विकास योजना मागविण्यात होत्या. यापूर्वीच्या बैठकीत शुल्क मंजूर झालेल्या एकूण ०२ महाविद्यालयाकडून तसेच प्रस्तुत बैठकीत शुल्क मंजूर होणाऱ्या ५ महाविद्यालयाकडून उपरोक्त अभिलेख प्राप्त झालेले आहेत. तरी या महाविद्यालयास सन २०२२-२३ पासून १० टक्के विकास शुल्क लागू करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ४ - ०७ महाविद्यालये**

पुढील वेळेस प्रस्ताव सादर करताना उपरोक्त महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षात विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा विकास शुल्काचा स्वतंत्र ताळमेळ (हिशोब) सादर करणे बंधनकारक राहील, असा निर्णय झाला. उर्वरित महाविद्यालयांनी परस्पर विकास शुल्क आकारू नये,असा निर्णय झाला.

**विषय क्र.७:-अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

७.१ राज्यातील काही विद्यापीठांनी Academic Audit करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्याचे शासनास कळविले आहे, त्याअनुषंगाने सर्व विद्यापीठांकडून Academic Audit चे अहवाल प्राप्त करून घ्यावेत आणि महाविद्यालयांचे ग्रेड तपासून माहिती पुढील बैठकीत सादर करण्यात यावी, असा निर्णय झाला.

७.२ शासननिर्णयानूसार दर तीन वर्षांनी शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. ज्या महाविद्यालयांनी शुल्क निश्चिती करून तीन वर्ष झाले आहेत, अशा महाविद्यालयांना सन २०२४-२५ च्या प्रस्तावासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करण्याबाबत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

Principal Secretary
The Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032